**प्रेसनोट दिनांक १३/०७/२०१९**

**फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे**

**अल्पवयीन मुलीची सुटका केलेबाबत**

दिनांक ११/०७/२०१९रोजी पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत सावंत हे शुक्रवार पेठ पोलीस चौकीस हजर असताना त्याना माहीती मिळाली की,एक अल्पवयीन मुलगी वय वर्षे १७ हीस पुणे् रेल्वे स्टेशन प्लॅट फॉर्म क्रमाक १ वरुन एका वयस्कर इसमाने तीला चांगले कपडे घें्वुन देतो असे म्हणुन जबरदस्तीने रिक्षात बसवुन घेवुन जात असल्याचे माहीती मिळाल्याने पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत सावंत यांनी तात्काळ श्री किशोर नावंदे वरिष्ठ पोलीस निरीक्षक फरासखाना पोलीस स्टेशन यांना सदरची माहीती कळवुन तात्काळ महीला पोलीस शिपाई शिंदे यांच्यासह पासोडया विठठल मंदीर येथे आले असता तेथे एका रिक्षातुन मुलगी ओरडत असल्याचे दिसल्याने त्यानी सदरची रिक्षा अडवुन रिक्षामध्ये असलेली अल्पवयीन मुलगी व तिच्यासोबत असलेला वयस्कर इसम ताब्यात घेवुन अल्पवयीन मुलीकडे चौकशी करता तिने मी माझ्ी घरची परिस्थिती गरीबीची असल्याने मी उस्मानाबाद येथुन रेल्वेने पुणे येथे आले.पुणे स्टेशन येथे आल्यानंतर मला कोठे जायचे हे कळत नसल्याने मी प्लॅटफॉर्म क्रमाक १ वर बसलेंली असताना सोबत असलेला वयस्कर इसम माझ्या जवळ आला व माझ्याकडे चौकशी करु लागला.परंतु मी त्याला उत्तरे देण्यास टाळाटाळ करु लागले त्यावेळी त्याने मला नवीन कपडे घेवुन देतो असे सांगुन माझा हात धरुन जबरदस्तीने रिक्षात बसवले व तो कोठेतरी घेवुन जात असल्याने मी आरडाओरडा केलेला आहे अशी हकीगत सांगितल्याने पोलीस उपनिरीक्षक सांवत यांनी मिळुन आलेल्या मुलीस सोबत असलेल्या महीला पोलीस शिपाई यांच्या ताब्यात देवुन ताब्यात घेतलेल्या इसमास त्याचा नाव पत्ता विचारले असता त्याचे नाव खालीलप्रमाणे.

हरी कन्हैया बिनावत वय ७२ वर्षे रा- स.नं ६८ संतोषनगर गणपती मंदीराजवळ हांडेवाडी रोड हडपसर पुणे.

वरील नमुद इसमास ताब्यात घेवुन त्याच्याविरुध्द अपहरण करणे व पोस्को कायदया अंतर्गत फरासखाना पोलीस स्टेशन येथे तक्रार नोद करुन सदरचा गुन्हा हा पुणे रेल्वे स्टेशन अंतर्गत घडलेला असल्याने पुढील तपासकामी प्रभारी अधिकारी पुणे रेल्वे स्टेशन पोलीस ठाणे यांच्याकडे वर्ग करण्यात आलेला आहे.

वरील नमुद कामगिरी ही मा.श्रीमती स्वप्ना गोरे,पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ पुणे शहर,मा.श्री प्रदीप आफळे ,सहा पोलीस आयुक्त फरासखाना विभाग पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री किशोर नावंदे ,वरिष्ठ पोलीस निरीक्षक फरासखाना पोलीस स्टेशन यांच्या सुचनेनुसार पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत सावंत व महीला पोलीस शिपाई शिंदे यांनी केलेली आहे.